

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी (रजि.क्र. ए-७०८)

श्री क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

दैनिक सकाळ

जाहीर निविदा

दि. 18/11/2026

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी या न्यासाच्या वतीने खालीलप्रमाणे कामाच्या विषयांच्या निविदा मागविण्यात येत आहेत :

१) **'श्री खंडोबा मंदिर गडकोट पूर्व दरवाजा ते जुनी जेजुरी पायरी मार्ग वाहन तळापर्यंत फोटोग्राफी'** व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर देणेबाबत. (टीप- सदरील टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. १,१२,२२२/-रुपये पेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.)

२) **'छत्रपती शिवाजी महाराज व शहाजीराजे भेट समूह शिल्प फोटोग्राफी'** व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर देणेबाबत. (टीप- सदरील फोटोग्राफी टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. ७३,३३३/- रुपये पेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.)

३) श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी यांचे मालकीचे अत्याधुनिक अन्नदान कक्षाच्या पश्चिमेकडील असणारी सि.स.नं. १३९५ मधील १८ X २५ फूट अशी मिळकत **''हॉटेल व्यवसायासाठी''** लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर देणेबाबत. (टीप- सदरील टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. ४५,२१०/- रुपये पेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.)

४) **''महाद्वार ते गणपती मंदिर वेस परिसर फोटोग्राफी''** व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर देणेबाबत. (टीप- सदरील टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. ९७,७७७/- रुपये पेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.)

५) श्री खंडोबा महाद्वार पायरी मार्गाच्या मध्यावर हेगडीप्रधान मंदिरानजीकची जागा **''ज्यूस स्नॅक्स सेंटर''** व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर देणेबाबत.

६) श्री खंडोबा मंदिर गडकोटामध्ये येणाऱ्या भाविकांना उत्तम दर्जा असलेले **''पिण्याचे पाणी बॉटल विक्री''** करणे.

७) चंपाषष्ठी उत्सवानिमित्त आपत्कालीन दत्त मंदिर गेटपासून अंध, अपंग, दिव्यांग, ७० वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिक व देणगीदार भाविक यांना श्री खंडोबा मंदिर पश्चिम दरवाजा बाजूला पार्किंग येथे घेऊन जाणे व पुन्हा खाली घेऊन येणेकामी रोजंदारी/ उक्ते तत्वावर चारचाकी ५ वाहने पुरविणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

नियम व अटी :

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/ व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/ उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु.५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.

३. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा **दि. १८-११-२०२६ ते दि. २३-११-२०२६ पर्यंत स. १० ते सायं. ५** या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ ई-निविदा धारकास कळविण्यात येईल.

५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ **www.khandoba.com** येथे उपलब्ध आहे.

६. प्रत्यक्ष पाहणी करून संपूर्ण माहिती घेऊन टेंडर भरणे.

७. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

८. अ.क्र. १, २, ३ व ४ करिता टेंडरफॉर्म जमा करतेवेळी अनामत रक्कम म्हणून किमान मर्यादा रकमेच्या १०% रक्कम डिमांड ड्राफ्टने देणे अनिवार्य आहे.

निविदा जमा करण्याचे ठिकाण : श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

''मल्हार'', भक्तनिवास (दुर्गामाता चौक), जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

आशिष मारुती बाठे, व्यवस्थापक
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

ॲड. विश्वास गोविंद पानसे, प्रमुख विश्वस्त
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी